आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२ जुलै २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- शेतकऱ्यांच्या फसवणुकीसंदर्भातल्या गुन्ह्यांच्या सुनावणीसाठी शेतकरी न्यायालयाचा राज्य सरकारचा प्रस्ताव

- शेतकरी आत्महत्या संदर्भातल्या प्रश्नांवर स्थगन प्रस्ताव नाकारल्यामुळे विधानसभेत विरोधकांचा सभात्याग

- अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर 'मकोका' अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा सरकारचा निर्णय

- ओला, उबर यासारख्या कंपन्यांना गर्दीच्या वेळेत मूलभूत प्रवासी भाड्याच्या दुपटीपर्यंत भाडे आकारण्याची केंद्र सरकारची परवानगी

**आणि**

- मुंबईसह संपूर्ण कोकण किनारपट्टीवर आज आणि उद्या मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><>**

राज्यात शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी आर्थिक गुन्हे विभाग, ईओडब्ल्यू आणि ग्राहक न्यायालयाच्या धर्तीवर शेतकरी न्यायालय उभारण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आज विधानसभेत दिली. सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. राज्यात सोयाबीन खरेदीसाठी २ केंद्रं निश्चित केली असून तिथं सुमारे पाच हजार पाचशे कोटी रुपयांची खरेदी झाल्याची माहिती त्यांनी आज विधासभेत दिली. सोयाबीन खरेदी केंद्रांची संख्या वाढवण्याची

आवश्यकता असल्यास सरकार याबाबत अनुकूल असल्याचं रावल म्हणाले. रोहित पवार यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

राज्यात वीज कोसळून मृत्युमुखी पडलेल्या शेतकरी किंवा शेतमजुरांच्या कुटुंबियांना दिली जाणारी चार लाख रुपयांची मदत वाढवून ती दहा लाख रुपये करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी आज विधानसभेत तारांकित प्रश्नोत्तराच्या तासात केली. याबाबत विचार करून मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असं आश्वासन आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिलं. अशा दुर्घटना रोखण्यासाठी दामिनी आणि सचेत हे दोन ॲप केंद्र सरकारच्या IITM संस्थेने विकसित केले असून त्याव्यतिरिक्त आणखी एक आधुनिक ॲप विकसित करण्यात येत आहे अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

शेतकरी आत्महत्या आणि बैलाच्या जागी स्वतः जोताला जोडण्याचा शेतकऱ्याचा प्रयत्न याविषयावर विरोधी पक्षांनी दिलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाकारला. या गंभीर स्थितीवर आताच चर्चा करण्याची मागणी विजय वडेट्टीवार आणि भास्कर जाधव यांनी केली, ती अध्यक्षांनी नाकारली. सरकारही चर्चेला तयार आहे, आम्हालाही शेतकऱ्यांची काळजी आहे, असं उत्तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावर दिलं. मात्र याचा निषेध करत विरोधी सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर 'मकोका' अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा निर्णय सरकारनं घेतला असून यासंदर्भातलं विधेयक या अधिवेशनात आणून त्यानुसार कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत केली. आमदार परिणय फुके यांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. असे गुन्हेगार एका राज्यात अटक होऊन जमीन मिळाल्यानंतर दुसऱ्या

राज्यात जाऊन तिथे गुन्हे करतात, हे टाळण्यासाठी सर्व राज्यांमध्ये माहितीची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं. अशा गुन्हेगारांविरुद्धचे खटले जलदगती न्यायालयात चालवण्यासाठी आवश्यक पावलं सरकार उचलत असून व्यसनमुक्ती केंद्रं उभारण्याचं कामही सुरू असल्याचं ते म्हणाले. तसंच NDPS अंतर्गत अंमली पदार्थांवर नियंत्रण आणण्यासाठीही विविध पावलं उचलली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. मध्य प्रदेशच्या सीमेवरून राज्यात अंमली पदार्थांची तस्करी होत असल्यास त्याचा तपास करून योग्य ती कारवाई करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><><>**

पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून राज्यात सुरु असलेल्या विकास प्रकल्पांची कामे पुढील शंभर वर्षांचा विचार करून आखावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. ते आज मंत्रालयात आयोजित बैठकीत बोलत होते. राज्याच्या विकासाची कामे पुढील शंभर वर्षांचा विचार करुन नियोजित वेळेत दर्जेदार पणे पूर्ण व्हावीत यासाठी केंद्रीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी त्यांनी राज्यात सुरु असलेल्या विविध विकास प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. या बैठकीला विविध विभागांचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

ओला, उबर, रॅपिडो यासारख्या कंपन्यांना गर्दीच्या वेळेत मूलभूत प्रवासी भाड्याच्या दुपटीपर्यंत भाडे आकारण्याची परवानगी केंद्र सरकारनं दिली आहे. पूर्वी ही मर्यादा दीडपट होती. गर्दी नसलेल्या वेळेत मूलभूत प्रवासी भाड्याच्या किमान निम्मी रक्कम भाडे म्हणून या कंपन्यांना आकारता येईल. केंद्री रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं यासंदर्भातले सुधारित दिशानिर्देश प्रसिद्ध केले आहेत. येत्या ३ महिन्यात नव्या दिशानिर्देशांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना मंत्रालयानं विविध

राज्यांना दिल्या आहेत. विविध वाहनांसाठी असलेल्या मूलभूत भाड्याची रक्कम राज्य सरकार निश्चित करते.

सक्षम कारणाशिवाय फेरी रद्द केली तर ग्राहकांना किंवा चालकाला एकूण भाड्याच्या रकमेच्या १० टक्के किंवा कमाल १०० रुपये दंड द्यावा लागेल.
चालकाच्या मालकीची गाडी असेल तर त्याला भाड्याच्या किमान ८० टक्के रक्कम द्यावी. कंपनीच्या मालकीची गाडी असेल तर चालकाला भाड्याच्या किमान ६० टक्के रक्कम द्यावी, असंही या दिशानिर्देशात नमूद आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज घाना, त्रिनिदाद - टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील, नामिबिया या ५ देशांच्या  दौऱ्यावर रवाना झाले. ते प्रथम घाना इथं जाणार असून उभयपक्षी हिताच्या अनेक मुद्द्यांवर बैठकांबरोबरच ते तिथल्या संसदेलाही संबोधित करणार आहेत. घानामधल्या भारतीय समुदायात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी उत्साहाचं वातावरण आहे. प्रधानमंत्री उद्या त्रिनिदाद टोबॅगो साठी रवाना होतील तिथे ते त्रिनिदादच्या राष्ट्रपती क्रिस्टिन कार्ला कांगालू आणि प्रधानमंत्री कमला प्रसाद बिसेसर यांची भेट घेतील.
त्यानंतर प्रधानमंत्री अर्जेंटिनाला जाणार असून गेल्या ५७ वर्षांतला भारतीय प्रधानमंत्र्यांचा हा पहिला अर्जेंटीना दौरा आहे. त्यानंतर  प्रधानमंत्री ब्राझील इथं येत्या ६ आणि ७ जुलैला  रिओ दी जिनेरो इथं होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहतील. गेल्या सहा दशकातला भारतीय प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच ब्राझील दौरा आहे. ब्राझीलचे अध्यक्ष लुईस इनासियो लुला दा सिल्वा यांच्याबरोबर ते चर्चा करतील.दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री नामिबियाला भेट देणार आहेत. तिथे ते नामिबियाचे अध्यक्ष डॉक्टर नेतुम्बो नंदी नदैतवाह यांची भेट घेतील.

**<><><><><>**

अमरनाथ यात्रेसाठी भाविकांची पहिली तुकडी आज रवाना झाली. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी आज पहाटे भगवती नगर इथं यात्रेकरूंना हिरवा झेंडा दाखवला. या तीर्थयात्रेसाठी एकूण ५ हजार ८९२ यात्रेकरू रवाना झाले आहेत. २ हजार ४८७ यात्रेकरु बालताल मार्गाने तर ३ हजार ४०३ यात्रेकरु पहलगाम मार्गाने अमरनाथला पोहोचतील. यात्रेचा समारोप ९ ऑगस्टला श्रावण पौर्णिमेच्या दिवशी होणार आहे. सरकारनं पुरवलेल्या सुविधा आणि सुरक्षेबद्दल यात्रेकरुंनी समाधान व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

कैलास मानसरोवर यात्रा २०२५ च्या यात्रेकरूंची पहिली तुकडी कैलास पर्वत आणि मानसरोवरची तीर्थयात्रा पूर्ण करून काल गंगटोक इथे सुखरूप परतली. ही तुकडी काल दुपारी १२ वाजून ४५ मिनिटांनी नथुला इथं पोहोचली.

**<><><><><>**

कोविडसाठीची लस आणि लसीकरणानंतर कमी वयाच्या लोकांचे अचानक झालेले मृत्यू, यांचा काहीही परस्परसंबंध नसल्याचा निष्कर्ष, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आणि राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्रानं सखोल अभ्यासानंतर काढला आहे. भारतातली कोविडची लस ही अत्यंत सुरक्षित आणि परिणामकारक असल्याचं तसंच तिचे अत्यंत कमी प्रमाणात साईड इफेक्ट्स असल्याचं या दोन संस्थांनी केलेल्या अभ्यासातून दिसून आलं आहे. ऑक्टोबर २०२१ ते मार्च २०२३ या काळात, वरकरणी निरोगी वाटणाऱ्या व्यक्तींच्या अचानक झालेल्या मृत्युंबाबत केलेल्या संशोधनातून, अशा मृत्यूंमागे अनुवांशिकता, जीवनशैली आणि आधीच असलेले आजार, अशी कारणं असल्याचं या संस्थांच्या निष्कर्षात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यात मौसमी पावसानं पुन्हा जोर धरला असून मुंबईसह संपूर्ण कोकण किनारपट्टीवर आज आणि उद्या मुसळधार पाऊस पडेल असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. दक्षिण भारतातला कमी दाबाचा पट्टा मध्य भारताकडे सरकत असल्यानं कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे या भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. उत्तर मुंबईतल्या बोरिवली, कांदिवली, दहिसर, मालाड या उपनगरात दक्षिण मुंबईच्या तुलनेनं अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे.

राज्यात रायगड, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, ठाणे, रत्नागिरी सातारा जिल्ह्यात तसंच पुणे आणि नाशिक घाटमाथ्यावर अतिमुसळधार पावसाची तर छत्रपती संभाजी नगर, जालना, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. सांगली, सोलापूर, परभणी, लातूर, बीड, धाराशिव, हिंगोली नांदेड जिल्ह्यात पावसाच्या हलक्या सरी बरसतील, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

दरम्यान, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात गेल्या २४ तासात झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्या-नाले ओसंडून वाहत आहेत. दोन्ही जिल्ह्यांना जोडणारा ब्रह्मपुरी - वडसा मार्गावरचा भूती नदीवरचा पूल वाहून गेल्यानं वाहतूक ठप्प झाली आहे.

**<><><><><>**

अँडरसन – तेंडुलकर करंडक क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज बर्मिंगहॅम इथल्या एजबस्टन इथं सुरु होणार आहे. साडे ३ वाजता सुरू होणाऱ्या या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. या मालिकेतला पहिला सामना भारतानं गमावला आहे.

**//<><><><><>//**